स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय
# स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी)

'A' विंग, तिसरा मजला, मित्तल टॉवर, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
☎ ०२२-२२०२०४६५ इमेल: director.smau@gmail.com

पत्रक्र. राअस/स्वमअ/ शहर समन्वय / २१-२२/ १९५९ दिनांक: १२/११/२०२१

राज्यातील स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण-२०२२ करिता सर्व नागरी स्थानिकस्वराज्य संस्थांमध्ये "शहर समन्वयक (City Coordinator) ची निव्वळ कंत्राटी पध्दतीने संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थे मार्फत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्या करीता खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत :-

| पदनाम | जागा | शैक्षणिक अर्हता | अर्ज कोणाकडे करावा | अनुभव | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| "शहर समन्वयक" (City Co-Ordinator) | ४०८ (पदांची संख्या कमी / जास्त होऊ शकते) | मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालील पैकी कोणतीही पदवी :<br>अ) बी.ई. (कोणतीही शाखा)<br>आ) बी.टेक. (कोणतीही शाखा)<br>इ) बी. आर्क.<br>ई) बी. प्लांनिंग<br>उ) बी.एस.सी.(कोणतीही शाखा) | उमेदवारांनी https://ccjob.smmurban.com/ या लिंकवर ऑन लाईन अर्ज करावा. (इतर कोणत्याही माध्यमाने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील कामाचा किमान ६ (सहा) महिन्यांचा अनुभव आवश्यक. | १)अमृत शहरे व गडचिरोली जिल्हयातील शहरांकरिता रु. ३५०००/- प्रती माह मानधन.<br>(# अमृत शहरांची यादी संकेत स्थळावर उपलब्ध आहे)<br>२)उर्वरित शहराकरीता रु. ३००००/- प्रती माह |

**(अ) अपेक्षित कामाचे स्वरूप :**

उमेदवाराची नियुक्ती होईल त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या खालील विषयांची अनुषंगीक कामे:

1) स्वच्छ सर्वेक्षण २०२२ संबंधित अनुषांगिक कामे
2) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, अनुषंगीक कामे
3) हागणदारी मुक्त शहरासंबंधीची कामे (ODF,ODF+/++,Water+) संबंधित अनुषांगिक कामे.
4) कचरा मुक्त शहरांच्या तारांकित मानांकना संबंधित अनुषांगिक कामे.
5) मुख्याधिकारी यांनी नेमून दिलेली स्वच्छ सर्वेक्षण संबंधित अनुषांगिक कामे.
6) वरीष्ठ कार्यालयाशी समन्वय साधणे.
7) स्वच्छ सर्वेक्षण टूलकीटनुसार कामे करण्यास नगरपरिषदेस सहकार्य करणे.
8) MIS भरणे.
9) इत्यादी.

(ब) उमेदवारांसाठी सूचना :

1) कंत्राटी तत्वावरील सदर नियुक्तीसाठी ऑनलाइनच अर्ज करावयाचा आहे.एका उमेदवाराने एकच अर्ज करावयाचा आहे. एकाहून अधिक अर्ज प्राप्त झाल्यास फक्त प्रथम प्राप्त अर्जावर कार्यवाही केली जाईल
2) उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज करण्याकरिता https://ccjob.smmurban.com/ या लिंकचा वापर करावा.
3) ऑनलाइन अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक २१ नोव्हेंबर २०२१ असा आहे.
4) अर्जात उमेदवारास आपल्या पसंतीचा महसूली किभाग नमूद करावयाचा आहे.
5) प्रथम पसंतीच्या महसूली विभागात संबंधित उमेदवारास ऑनलाइन मुलाखत द्यावी लागेल.
6) कंत्राटी तत्वावरील सदर नियुक्तीसाठी महसूली विभागात संबंधित विभागीय विभागीय सहआयुक्त, नगर प्रशासन यांच्या अंतर्गत निवड समिती मार्फत ऑनलाइन मुलाखत (Video Conference)घेतली जाईल. ऑनलाइन मुलाखतीचा वेळ, दिनांक व लिंक आपणास स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.
7) या प्रक्रियेद्वारे निवड झालेल्या पात्र उमेदवारांची कंत्राटी तत्वावर नियुक्तीसाठी संबंधित नागरिक संस्थेकडे विभागीय सहआयुक्त, नगर प्रशासन यांचे मार्फत शिफारस करण्यात येईल.
8) सदर शिफारसीनुसार संबंधित नागरिक संस्थेमार्फत संबंधित उमेदवारांस कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.
9) संबंधित नागरिक स्वराज्य संस्थेमार्फत नियुक्ती पत्र मिळाल्यावर उमेदवारास तात्काळ नियुक्ती दिलेल्या शहरात रुजू व्हावे लागेल.
10) नियुक्तीच्या ठिकाणात बदल करण्यात येणार नाही.
11) शहरांची संख्या व आवश्यक पद संख्येत बदल होऊ शकतो.

(क) अटी व शर्ती :कंत्राटी

1) कंत्राटी तत्त्वावरील सदर नियुक्ती “ स्वच्छ सर्वेक्षण-२०२२” अंतर्गत दि.३१/०३/२०२२ किंवा स्वच्छ सर्वेक्षण २०२२ ची तपासणी पूर्ण होई पर्यंत राहील.
2) नियुक्ती कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.
3) कंत्राटी तत्त्वावर नियुक्त केलेल्या सदर कर्मचाऱ्यांस शासकीय कर्मचाऱ्यांस मिळणाऱ्या कोणत्याही सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही. / अनुज्ञेय असणार नाही.
4) सदर नियुक्ती ही पूर्णतः कंत्राटी मानधन तत्वावर आहे.
5) सदर मानधन संबंधित नागरिक स्वराज्यसंस्थेमार्फत अदा करण्यात येईल.
6) उमेदवाराचे वय दि. १ जून २०२१ रोजी ३५ वर्षापेक्षा अधिक नसावे.
7) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत स्वच्छ सर्वेक्षण विषयक केलेल्या कामकाजाच्या अनुभवाचा प्राधान्य असेल.
8) सदर अटी, शर्ती व नियुक्ती प्रक्रियेत बदल करण्याचे तथा रद्द करण्याचे प्राधान्य अधिकार कार्यकारी संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय यांनी राखून ठेवलेले आहेत.

(स्वाक्षरीत)
राज्य अभियान संचालक
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)